REGISTERED No. B. 3434




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १४ | पुणें, बुधवार तारीख २० आक्टोबर, १९४८ | अंक ४२

श्री — श्री — श्री — श्री — श्री

श्री

## दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

### युद्धोत्तरकालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

श्री — श्री — श्री — श्री — श्री

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

# मशिनरी खरेदीचा प्रश्न

कोणतीहि मशिनरी खरेदीण्यापूर्वी आमचा सल्ला घ्या.
आमचें सहकार्य आपल्या नेहमींच फायद्याचें ठरेल.
लेथ्स, ड्रिलिंग मशिन्स, ऑइल एंजिन्स, वगैरेचे विक्रेते.
केळकर बंधू, बुधवार चौक. पुणें २.


## विविध माहिती

**राजाबहादुर मोतिलाल पूना मिल्स लि.**—वरील कंपनीस गेल्या वर्षी २,९५,९६८ रु. नफा झाला. ऑर्डिनरी भागांस ४ रु. करमाफ डिव्हिडंड मिळालें.

**कर चुकविणारांची चौकशी: बँकांकडून खात्यांच्या तपशिलाची मागणी**—गेल्या सात वर्षांतील, बँकांकडील २५ हजारांवरील ठेवी आणि १ लाखावरील चालू खातीं ह्यांचा तपशील टॅक्स इव्हेजन इन्व्हेस्टिगेशन कमिशननें हिंदुस्थानांतील सर्व बँकांकडून मागविला आहे. ३० नोव्हेंबरपूर्वी ही माहिती बँकांनीं पुरवावयाची आहे.

**सिलोनसाठी रिझर्व्ह बँक**—सिलोनमध्यें मध्यवर्ती बँक स्थापन करण्यांत यावयाची आहे. त्याबाबत तेथील सरकारास सल्ला देण्यासाठी फेडरल रिझर्व्ह बँकेचा एक अमेरिकन तज्ज्ञ लवकरच दाखल होणार आहे.

**टाटा आयर्नची गांधी फंडास देणगी**—टाटा आ. अँड स्टी. कं. लि. च्या भागीदारांच्या विशेष साधारण सभेनें महात्मा गांधी स्मारक निधीस १५ लक्ष रु. मंजूर केले. कंपनीला गेल्या वर्षी ५ कोटी रु. नफा झाला होता, त्याचे प्रमाणांत ही रक्कम ठरविण्यांत आली आहे टाटा हैड्रो इलेक्ट्रिक पॉवर सप्लाय कं. नें १ लक्ष रु. दिले.

**मद्रासमधील शिधा वाटप**—अन्नधान्याचें नियंत्रण चालू असलेल्या मद्रास प्रांतांतील विभागांत १० ऑक्टोबर पासून दरमाणशीं दररोज १० औंसांऐवजी ८ औंस शिधा मिळणार असल्याचें मद्रास सरकारनें जाहीर केलें आहे.

**निर्वासितांची प्रांतवार वाटणी**—एकूण ३५½ लक्ष निर्वासितांपैकी ५ लक्ष निर्वासितांचा 'कोटा' मुंबई प्रांताच्या वाट्यास आला आहे. पूर्व पंजाब व तेथील संस्थानें ह्यांनीं १३ लक्ष निर्वासितांची सोय पहावयाची आहे. मध्यप्रांतांत ३ लक्ष निर्वासितांची सोय लागेल.

**पोस्ट ऑफिसांचा देणगी स्वीकारण्याकडे उपयोग**—गांधी स्मारक निधीच्या देणग्या सुमारें २५,००० पोस्ट ऑफिसांतून स्वीकारण्याची व्यवस्था लवकरच करण्यांत येत आहे. खेडेगांवांतील देणगीदारांची त्यामुळें सोय होईल.

**लिमिटेड कंपन्यांना सावकारी लायसेन्स**—पैसे कर्जाऊ देण्याचा धंदा करणाऱ्या लिमिटेड कंपन्यांना सावकारी नियंत्रण कायद्याचे कक्षेंत आणणारी दुरुस्ती करणारें बिल मुंबई विधिमंडळानें मंजूर केलें आहे. प्रत्येक कर्जदाराकडून दरसाल २ रु. पर्यंत खर्च वसूल करण्याचा अधिकार आतां सावकारांना मिळाला आहे.

**बँका ओळीनें सहा दिवस बंद**—ता. ९ ऑक्टोबर ते १५ ऑक्टोबरअखेर ओळीनें सहा दिवस 'पूजा' निमित्त कलकत्ता येथील बँकांस सुटी होती.

**साखरेची किंमत उतरणार**—साखरेचें रेशनिंग पुनः सुरू करण्याचा सरकारचा विचार नाहीं. हिंदी साखरेची किंमत उतरविण्याचा सरकार प्रयत्न करणार आहे. सध्याच्या भारी किंमतीस हिंदी उत्पादनाचा उठाव होणार नाहीं.

**फडणीस-मंत्र्यांची परिषद**—मध्यवर्ती सरकारच्या फडणिसांनीं प्रांतिक फडणिस-मंत्र्यांची एक परिषद ता.२६ व २७ आक्टोबरला दिल्ली येथें भरविण्याचें ठरविलें आहे. ह्या परिषदेंत प्रांतिक व मध्यवर्ती सरकारांच्या युद्धोत्तर पुनर्घटनेच्या योजना, प्राप्तीवरील कराची वाटणी, इत्यादि विषयांचा विचार होणार आहे, असें समजतें.

**पाकिस्तानसाठी मोफत तिकिटें**—लंडनच्या थॉमस डिलास अँड कंपनीनें कायदे-आझम मदत फंडासाठी मोफत तिकिटें छापून देण्याचें कबूल केलें आहे. ह्या तिकिटांच्या विक्रीची रक्कम कंपनीकडून फंडाला दिलेली मदत म्हणून समजण्यांत येईल. तिकिटांच्या नमुन्यासाठी पाकिस्तान सरकारनें २५० रुपयांचें बक्षिस जाहीर केलें आहे.

**कमी उंचीवर बटाटे पिकविणार**—मद्रास प्रांतांत निलगिरी येथेंच बटाट्याचें पीक मुख्यतः काढण्यांत येतें. मद्रास सरकारचे कृषि-रसायन तज्ञानें ४ हजार फूट उंचीवरहि बटाटे पिकविण्याची योजना हातांशीं घेतली आहे. अन्नमळाय, तिनेवेल्ली व शेव्हाराय ह्या डोंगराळ भागांतून हा प्रयोग करण्यांत येत आहे. निलगिरी येथील बटाट्याचें बीं कमी उंचीवर येण्यासारखें नसल्यानें संयुक्त प्रांतांतून बीं मागविण्यांत आलें आहे.

**दारूबंदीचे परिणाम अजमावणार**—मुंबई प्रांताच्या दारूबंदीविषयक बोर्डानें, ज्या शहरांतून दारूबंदी चालू आहे तेथें सामाजिक व आर्थिक परिणाम होतात ते पहाण्यासाठी एक तपासणीयोजना ठरविली आहे. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस ह्या संस्थेतर्फे वरील योजनेच्या प्रत्यक्ष कार्याला सोलापूर शहरांत लवकरच प्रारंभ होणार आहे. खेड्यांतील दारूबंदीचे परिणामहि अशाच रीतीनें अजमावण्यांत येणार आहेत.

**इन्सुलिनचा तुटवडा पडणार**—संयुक्त-राष्ट्रसंघटनेच्या आरोग्य संघटनेचे डायरेक्टर नुकतेच मुंबईला आले होते. जगांत इन्सुलिन ह्या मधुमेहावरील औषधाला फार मागणी असल्यानें सर्व देशांना हें औषध आपआपल्या देशांत तयार करावें असें मत त्यांनीं व्यक्त केलें. सध्या हिंदुस्थानला होणारा ह्या औषधाचा सर्व पुरवठा परदेशाहून येतो. हें औषध स्वतः तयार करण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें तर संघाची जागतिक आरोग्य संघटना हिंदी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची थोडीबहुत सोय करूं शकेल, असें त्यांनीं सांगितलें.

**तांदुळाच्या उत्पादनांत घट**—१९४७-४८ सालीं हिंदुस्थानांतील तांदुळाच्या उत्पादनांत १० लाख टनांची घट होईल असा अंदाज करण्यांत आला आहे. ह्या अंदाजाप्रमाणें भाताखालील जमिनीचें क्षेत्र ५,९६,५६,००० एकर असून उत्पादन १,८७,६०,००० टन होईल. हे आंकडे गेल्या वर्षी अनुक्रमें ६,०९,८७,००० एकर व १,९८,५६,००० टन असे होते. म्हणजे चालू सालीं क्षेत्रांमध्यें २ टक्के व उत्पादनांत ६ टक्के घट होईल असें दिसतें.


-सर्व प्रांतांतील-
सुती – गरम – रेशमी
-खादीचें माहेरघर-
# खादी मन्दिर
२६२, बुधवार पेठ
ढमढेरे बोळाजवळ
पुणें २

# अर्थ

बुधवार, ता. २० आक्टोबर १९४८




प्रो. वा. गो. काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## ब्रिटनमधील औद्योगिक संशोधनाची संघटना

हिंदुस्थानचें औद्योगीकरण कमीअधिक त्वरेनें होणार हें आतां निश्चित झालें आहे. औद्योगीकरणांत शास्त्रीय संशोधनाला अर्थातच अतिशय महत्त्व आहे. तथापि हें संशोधन विस्कळितपणें न होता योजनापूर्व झालें, तर पैसा, श्रम आणि काळ ह्यांची फार बचत होते. त्या दृष्टीनें ब्रिटनमधील उद्योगविषयक संशोधन कसें चाललें आहे तें समजून घेणें महत्त्वाचें आहे.

आधुनिक सुसंस्कृत जीवनाची घडी बसविण्याच्या कामीं ब्रिटिश शास्त्रज्ञांनीं केलेल्या संशोधनाला बरेंच श्रेय द्यावें लागेल. ह्या जीवनाचा पाया संशोधकांनीं केलेल्या शोधांमुळेंच घातला गेला असें म्हटल्यास तें वावग होणार नाहीं. आज सुद्धां ब्रिटिश निर्यात व्यापार वाढविण्याच्या कार्यांत ब्रिटिश संशोधकांना महत्त्वाचें कार्य करावें लागत आहे. ज्या देशांतून पूर्वी ब्रिटिश माल खपत असे, त्या देशांतून स्थानिक उद्योगधंदे वाढूं लागलेले आहेत. त्यामळें अद्यावत् शास्त्रीय संशोधनाचें साह्य घेऊन, ज्या मालाला तेथें स्पर्धा नाहीं अशा प्रकारचा नवा माल ब्रिटिश उद्योगधंद्यांना निर्माण करावा लागत आहे. ब्रिटनमधील औद्योगिक संशोधनाचे दोन भाग पडतात; पहिला शुद्ध संशोधनाचा आणि दुसरा तादृश फलदायी होणारा. ब्रिटनमधील औद्योगिक क्रांतीचा काल म्हणजे १७६० ते १८६० पर्यंतचा होय. ह्या कालांत माणसाच्या श्रमाऐवजी यंत्रशक्ती वापरण्याचें काम मुख्यत: पूर्ण झालें. ह्या औद्योगिक क्रांतीला अलीकडे पहिली औद्योगिक क्रांति म्हणण्याची प्रथा पडली आहे. कारण, गेल्या २५ वर्षांत औद्योगिक संशोधनांत झालेल्या प्रगतिमुळें पहिल्या इतकीच महत्त्वाची दुसरी औद्योगिक क्रांति झाली आहे असें तज्ज्ञांचें मत आहे. पहिल्या औद्योगिक क्रांतींतील संशोधन मुख्यत: वैयक्तिक संशोधकांच्या श्रमाचें फल होतें. विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून मात्र संशोधन-शाळा कारखानदारीशीं अधिक निकटच्या नात्यानें संबंधित होऊं लागल्या. तथापि, लहान सहान कारखान्यांना स्वत:च्या खर्चानें प्रयोगशाळा चालविणें शक्य नव्हतें. म्हणून, उद्योगधंद्यांशीं सहकार्य करून औद्योगिक संशोधन करण्यासाठीं पहिल्या महायुद्धाच्या कालांत शास्त्रीय व औद्योगिक संशोधनाचें एक सरकारी खातें स्थापन करण्यांत आलें. योग्य ती फी देऊन उद्योगधंद्यांना ह्या खात्याचें सभासद होता येतें.

हल्लीं ब्रिटनमध्यें औद्योगिक संशोधन पुढीलप्रमाणें संघटित करण्यांत आलेलें आहे. ( १ ) कारखान्यांचीं संशोधन केंद्रें, ( २ ) सहकारी संशोधन संस्था, ( ३ ) सरकारच्या मार्गदर्शनाखालील प्रयोगशाळा, ( ४ ) विद्यापीठांच्या प्रयोगशाळा, ( ५ ) तांत्रिक शिक्षण देणारीं कॉलेजें आणि खाजगी व्यक्ती ह्यांनीं चालविलेलें संशोधन. हल्लीं एकूण १,००० ब्रिटिश कंपन्या व्यक्तिश: संशोधनाचें कार्य करीत आहेत. ब्रिटिश उद्योगधंदे ह्या संशोधनासाठीं दरवर्षी सुमारें ३ कोटी पौंड खर्च करतात व त्या कामांत अंदाजें ४५ हजार माणसें गुंतलेलीं असतात. ह्या संख्येपैकीं जवळ जवळ १० हजार संशोधक विद्यापीठाची पदवी घेतलेले अगर तत्सम योग्यतेचे असतात. गणिती, पदार्थविज्ञानशास्त्रज्ञ, रसायनशास्त्रज्ञ, जीवशास्त्रज्ञ, एंजिनिअर्स, धातुशास्त्रज्ञ इत्यादी प्रकारचे जाणते लोक वरील दहा हजारांत असतात. सहकारी तत्त्वावर संशोधन करणाऱ्या ३५ संस्था आहेत. ह्या संस्थांचें सभासदत्व हजारों कारखान्यांनीं स्वीकारलें असून ब्रिटनच्या उत्पादक उद्योग-धंद्यांपैकीं दोन तृतियांश उद्योगधंदे त्यांतून सामील झालेले आहेत. ह्या संस्थांचें एकूण उत्पन्न ३० लाख पौंडांपेक्षां अधिक आहे. त्यापैकीं १० लाखांची सरकारी मदत आहे. तांत्रिक शिक्षण देणाऱ्या १५ कॉलेजांतूनहि बरेंच संशोधन केलें जातें. ह्यापैकीं १० कॉलेजांच्या संशोधन शाळांतून औद्योगिक संशोधनाला लागणारी विशेष प्रकारची सामुग्री आहे. ब्रिटनच्या तांत्रिक कॉलेजांतून संशोधन करणारे ३२० संशोधक आहेत. त्यांपैकीं २०० कॉलेजांतून अध्यापन करणारे आहेत. बऱ्याच विद्यापीठांतूनही औद्योगिक दृष्ट्या मूलभूत असणारें संशोधन करण्यांत येतें. विद्यापीठांतील कांहीं संशोधन कार्याला कारखान्यांकडून पैशाची मदत करण्यांत येते. उद्योगधंदे आणि विद्यापीठें ह्यांच्यांतील संबंधाविषयीं रॉयल सोसायटीच्या अध्यक्षांनीं पुढील धोरण सूत्र वाक्याच्या रूपांत सांगितलेलें आहे: "विद्यापीठांना मदत करा. त्यांना संशोधनाचें स्वातंत्र्य द्या, आणि त्यांच्या कार्याशीं परिचय" राखा. ज्या ज्या लहान उद्योगधंद्यांना स्वत:चें स्वतंत्र संशोधन खातें खर्चाच्या दृष्टीनें परवडत नाहीं, ते खाजगी संशोधक ठेवून जरूर तें संशोधन करवून घेतात.

**मुंबई सरकारला कर्जाऊ मदत**—मुंबई प्रांताच्या सरकारला आपली रहात्या घरांची योजना पार पाडण्यास मदत म्हणून मध्यवर्ती सरकारनें ४ कोटी रुपयांचें कर्ज मंजूर केलें आहे, असें समजतें.

**सरकारच्या मालकीची वहातुक कंपनी**— ऑस्ट्रेलिआच्या मध्यवर्ती सरकारचे पंतप्रधान सरकारच्या मालकीची एक आगबोट कंपनी स्थापण्याचें बिल विधिमंडळांत मांडणार आहेत. ही कंपनी ऑस्ट्रेलिआच्या किनाऱ्यावर व परदेशींहि वहातूक करणार आहे. तथापि इतर व्यापारी कंपन्यांवर तिचें नियंत्रण रहाणार नाहीं.

**हिंदुस्थानांत नर्सेस फार कमी आहेत**—पुढारलेल्या ब्रिटनमध्यें सुद्धा नर्सेसची संख्या फार थोडी आहे. तेथें साधारणपणें दर दोन हजार माणसांगणिक एक नर्स, असें प्रमाण पडतें. हिंदुस्थानांत दर ४३ हजार माणसांगणिक एक नर्स असें प्रमाण आहे. एकट्या लंडन शहरांत जितक्या नर्सस आहेत त्यांहीपेक्षा सर्व हिंदुस्थानांत मिळून कमी आहेत.

### दिवाळी अंक

"अर्थ" चा ह्यापुढील अंक दिवाळी अंक असून त्यांत दरवर्षीप्रमाणें महत्त्वाच्या आर्थिक विषयांवर अनेक तज्ज्ञांचे लेख प्रसिद्ध होतील. त्यानंतरचा अंक १७ नोव्हेंबर रोजीं प्रसिद्ध होईल.

## महाराष्ट्रीय कंपन्यांच्या शेअर्सची खरेदी-विक्रीची सोय

### स्टॉक एक्सचेंजची प्रथम पायरी : भारत इं. बँकेचे मॅ. डायरेक्टर श्री. क्षीरसागर ह्यांची योजना

( महाराष्ट्रीय कंपन्यांत शेअर्स व ठेवी ह्यांचे रूपानें पैसा गुंतवून महाराष्ट्राच्या औद्योगिक वाढीस हातभार लावण्याचें श्रेय जनता अधिकाधिक प्रमाणांत घेत आहे. त्यांपैकी ठेवी ह्या मुदतीनंतर परत मिळावयाच्या असतात व त्यामुळें मुदत संपण्याचे वेळीं आपली ठेव पुनः कोठें ठेवावयाची ह्याचा फेर-विचार करण्यास ठेवीदारास संधी मिळत असते. शेअर्सचें तसें होत नाहीं; भागीदाराच्या मर्जीप्रमाणें शेअर्सचें भांडवल कंपनी स्वतः परत करीत नाहीं. शेअर्सवरील मालकी हक्काची मात्र खरेदी-विक्री होऊं शकते.तथापि, अशा खरेदी-विक्रीची संघटित व्यवस्था आज महाराष्ट्रांत अस्तित्वांत नाहीं. आपल्या कंपन्यांचे भाग कंपन्यांच्या प्रवर्तकांनीं खटपट करूनच बहुधा खपविलेले असतात; आपण होऊन भाग घेणारे थोडे. त्यामुळें भागांची खुषीनें खरेदी करणारें मोठें गिऱ्हाइक नसल्याकारणानें आणि जवळचे भाग बऱ्या किंमतीस देऊन टाकण्यास बहुतेक भागीदार तयार असल्याकारणानें, कंपन्यांच्या भागांची बाजारपेठ निर्माण होऊं शकलेली नाहीं. बाजारपेठेस विक्रेत्याप्रमाणें गिऱ्हाइकहि पण लागत असतें. महाराष्ट्रीय कंपन्यांच्या भागांस बाजारी किंमत नसल्याकारणानें, त्यांची विक्री करून पैसे उभे करणें कठीण जातें. त्यामुळें अशा भागांच्या तारणावर कर्ज देण्यास बँकाहि फारशा उत्सुक नसतात. भाग विकले जाण्यास ह्या महत्त्वाच्या अडचणी आहेत. अर्थात् कांहीं प्रमुख मोठ्या महाराष्ट्रीय कंपन्यांच्या भागांस मात्र हें वर्णन लागू नाहीं. त्यांच्या भागांची खरेदी-विक्री खासगी रीतीनें व दलालामार्फत चालू आहे व त्यांचे तारणावर थोडें-फार कर्जहि मिळूं शकतें. कंपन्यांनीं विक्रीस काढलेलें सर्व भांडवल खपलें असेल, त्यांचा कारभार किफायतशीर असेल व त्या डिव्हिडंड देत असतील तर त्यांच्या भागांची खरेदी-विक्री होणें सोपें जातें व तारण म्हणून त्यांचा स्वीकार केला जातो. मुख्य प्रश्न आहे तो बहुसंख्य इतर कंपन्यांच्या भागांचा. भारत इं. बँकेचे मॅ. डायरेक्टर श्री. नी. ना. क्षिरसागर ह्यांनीं प्रस्तुत विषयाचा बराच अभ्यास करून मराठा चेंबरमार्फत अंमलांत आणावयाची एक योजना सुचविली आहे, ती आमच्या वाचकांना येथें सादर करीत आहों. त्यांनीं आपल्या सूचना श्री. क्षीरसागर ह्यांचेकडे अगत्यपूर्वक पाठवाव्यात. महाराष्ट्रीय कंपन्यांच्या चालकांनींहि त्या बाबतींत सहकार्य केल्यास योजनेचें पाऊल पुढें पडण्यास मदत होईल.)

पूर्वतयारीः—( १ ) महाराष्ट्रीय जॉइंट स्टॉक कंपन्यांची यादी.

( २ ) प्रत्येक कंपनीचें मेमोरॅन्डम व आर्टिकल्स ऑफ असोसिएशन कॉपीज.

( ३ ) कंपनी संस्थापनेपासूनचे बॅलन्स शीटस व रिपोर्टस.

( ४ ) प्रत्येक कंपनीच्या शेअर भांडवलाचे प्रकार : डिफर्ड, प्रेफरन्स, ऑर्डिनरी.

( ५ ) शेअर्स कोणत्या दर्शनी किंमतीचे आहेत व पेड अप् किती.

( ६ ) शेअर्स विक्री संपूर्ण झाली किंवा कंपनीकडे भांडवल विक्रीचें शिल्लक आहे.

( ७ ) कंपनीचें बोर्ड ऑफ डायरेक्टर्स.

( ८ ) कंपनीची मॅनेजमेंट.

( ९ ) कंपनीच्या शेअर्सना मागणी कशी आहे ( स्थूलमानानें कल्पना )

ब्रोकर्स नेमणुकाः—मराठा चेम्बरनें महाराष्ट्रीय कंपन्यांच्या शेअर्सच्या खरेदी-विक्रीकरितां तूर्त पुण्यांत दहा अधिकृत ब्रोकर्स नेमावेत. या नेमणुकीस चेम्बरनें नाममात्र फी ठेवावी.

ब्रोकर्सची असोसिएशनः— ( १ ) अधिकृत ब्रोकर्सची ही असोसिएशन राहील. या असोसिएशनमार्फत शेअर्सच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार व्हावेत.

( २ ) शेअर्स खरेदी-विक्रीचे व्यवहारांची वाढ होईपर्यंत हे सर्व व्यवहार असोसिएशनमार्फत व्हावेत. निदान तीन वर्षेंपावेतों व्यक्तिविषयक ब्रोकरनीं व्यवहार करूं नयेत. ( नंबर ४ अपवाद )

( ३ ) असोसिएशनचा खर्च व मिळणारा नफा असोसिएशनचे सभासदांत वांटण्यांत यावा.

( ४ ) असोसिएशनचा सभासद राहून एखाद्या ब्रोकरला स्वतंत्र धंदा करावा असें वाटल्यास तशी परवानगी चेंबरला योग्य वाटल्यास द्यावी. त्या ब्रोकरचा, असोसिएशनचे नफा-नुकसानींत संबंध राहाणार नाहीं.

ब्रोकर्स कमिशन दरः—चेम्बरनें तूर्त खालील दर ठरवून द्यावेत.

| | | |
|---|---|---|
| ( अ ) | शेअरची दर्शनी किंमत रु. २५ पर्यंत शेअरमागें | रु. १ |
| ( ब ) | ,, ,, ,, ५० पर्यंत शेअरमागें | रु. २ |
| ( क ) | ,, ,, ,, १०० पर्यंत शेअरमागें | रु. ३ |
| ( ड ) | ,, ,, ,, रु. १०० चे वर शेकडा | रु. ३ |

या कमिशनशिवाय ट्रॅन्सफरचा खर्च अलाहिदा आकारावा.

( सदरचे दर विशिष्ट हेतूनें जास्त ठेविले आहेत. )

बाजारभावः—चेम्बरनें दरमहा भावांचें पत्रक छापून सर्व सभासदांकडे पाठवावें. तसेंच ब्रोकर्सना हीं पत्रकें कांहीं नाममात्र खर्च घेऊन पुरविण्यांत यावीत. चेम्बरच्या मासिक वृत्तांत हें पत्रक छापावें.

शेअर्स खरेदी-विक्री करारः—तूर्त हे खरेदी-विक्रीचे व्यवहार पत्रोपत्रीं व्हावेत. तथापि कायदेशीर अडचण येत असल्यास ब्रोकर्सनींही कॉन्ट्रॅक्ट रीतसर करावीं. हा खर्च ब्रोकर्सनीं सोसावा.

शेअर बाजाराची जागाः—ब्रोकर्समार्फत होणाऱ्या व्यवहारांचा बटवडा करण्यास चेम्बरनें जागा द्यावी. असोसिएशनचें ऑफिस चेम्बरचे इमारतींत राहावें.

बँकांमार्फत ॲडव्हान्सची व्यवस्थाः—( १ ) चेम्बरनें बँकर्स असोसिएशन स्थापन करावी.

( २ ) शेअर्सवर ॲडव्हान्स द्यावा, अशी शिफारसवजा एक यादी तयार करून वेळोवेळीं बँकांना देत जावी.

( ३ ) असोसिएशनचे सभासद-बँकांचे मार्फत महाराष्ट्रीय कंपन्यांचे शेअर्सवर ॲडव्हान्स देणाऱ्या बँकांचे प्रसिद्धीकरण चेम्बरच्या मासिकवृत्तांतून व बाजारभावाचे पत्रकांतून नियमित करीत जावें.

( ४ ) ॲडव्हान्सचें परसेंटेज बँकांनीं ठरवावें व तें चेम्बरनें माहितीकरतां शेअर-ब्रोकर्सना कळवावें.

( ५ ) महाराष्ट्रीय बँकांनीं या कामीं सहकार्य देण्याविषयीं चेम्बरनें बँकांचे चालकांना कळवावें.

इतर व्यवस्थाः—( १ ) महाराष्ट्रीय कंपन्यांचे शेअर्स-खरेदी विक्रीचा अहवाल दरमहा मासिक वृत्तांतून प्रसिद्ध करावा.

( २ ) मराठी शेअर ब्रोकर्स ही संस्था गेलीं दोन वर्षे पुणें येथें कार्य करीत आहे. या संस्थेस ब्रोकर्स या दृष्टीनें प्रथम प्राधान्य देण्यांत यावें.

( ३ ) ही योजना चेम्बरच्या सर्व सभासदांना विचाराकरतां व सूचनांकरितां मासिक वृत्तांत प्रसिद्ध करावी.

( ४ ) 'स्टॉक-एक्सचेंज'च्या योजनेंतील प्रथम पायरी म्हणून ही योजना आहे.

## सहकारी कायद्याबाबत मुंबई हायकोर्टाचा एक निर्णय

**( स. वा. दातार )**

मुंबई हायकोर्टानें दिलेला सहकारी कायद्याबाबत एक मजेदार निर्णय नुकताच प्रसिद्ध झाला आहे. मालेगांव को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिक्विडेशनमध्यें निघाली व तिच्यातर्फे लिक्विडेटर यांनीं प्रतिवादीवर कांहीं मिळकतींचा ताबा मिळावा म्हणून दावा केला. दाव्याचा निकाल सोसायटीसारखा होऊन मिळकतींचा ताबा प्रतिवादींनीं सोसायटीस द्यावा असा हुकूम झाला. त्यावर प्रतिवादींनीं अपील केलें. अपीलांत वरील निकाल फिरविला गेला व सोसायटीचा दावा खर्चासुद्धां रद्द करण्यांत आला. त्यावर सोसायटीनें मुंबई हायकोर्टाकडे अपील केलें; परंतु त्याचाहि निकाल खर्चासह सोसायटीचे विरुद्ध लागला. अशाप्रकारें कोर्टानें देवविलेल्या खर्चाचें एकूण २२६ रु. ९ आणे, १० पै प्रतिवादीस सोसायटीकडून येणें झालें व तें वसूल करून घेण्यासाठीं त्यानें प्राथमिक कोर्टांत दरखास्त दाखल केली. परंतु ही दरखास्त देण्यापूर्वी बॉम्बे को-ऑपरेटिव्ह सोसायटीज् ॲक्टच्या ५१ व्या कलमाप्रमाणें रजिस्ट्रार यांची संमति मिळवावयास हवी होती. ती दरखास्तदार यांनीं मिळविलेली नव्हती म्हणून कोर्टानें दरखास्त काढून टाकली. तेव्हां दरखास्तदारांनीं असिस्टंट जज्जांकडे अपील केलें; पण त्याहि कोर्टानें खालील कोर्टाचाच निकाल कायम केला, तेव्हां मग दरखास्तदार यांनीं मुंबई हायकोर्टाकडे अपील केलें.

बॉम्बे को-ऑपरेटिव्ह सोसायटीज् ॲक्टच्या ५१ व्या कलमांत असें सांगितलें आहे कीं, एकदां एकाद्या सोसायटीचा कारभार आवरण्याबाबतचा हुकूम झाला कीं, मग त्या सोसायटीच्या व्यवहाराबाबत तिजविरुद्ध कोणताहि दावा अथवा अन्य न्यायकाम ( लीगल प्रोसिडिंग ) दाखल करतां येणार नाहीं अथवा पुढें चालवितां येणार नाहीं.

यावर दरखास्त म्हणजे दावा अथवा अन्य न्यायकाम ( लीगल प्रोसिडिंग ) नव्हे, असा युक्तिवाद मांडण्यांत आला होता; परंतु हायकोर्टानें तो ग्राह्य धरला नाहीं व दरखास्त हें न्यायकामच आहे असें ठरविलें. त्यामुळें ती दरखास्त दाखल करण्यापूर्वी रजिस्ट्रारची संमति मागणें आवश्यक ठरलें. परंतु या प्रकरणांतील दरखास्तदार व सोसायटी यांच्या भूमिका प्रसंगोपात् बदलत गेलेल्या होत्या. मूळ दावा सोसायटीनें लावला. सोसायटीविरुद्ध दावा लावण्यास रजिस्ट्रारची संमति आवश्यक असली तरी त्या संमतीचें बंधन सोसायटीवर नव्हतें. पुढें या दाव्याचा जो निकाल प्राथमिक कोर्टानें सोसायटीचे बाजूचा दिला, तो फिरवून घेण्यासाठी अपील करण्यापूर्वी प्रतिवादींनीं रजिस्ट्रारची संमति मागणें आवश्यक होतें. परंतु ती मागण्यांत आली नव्हती व सोसायटीकडूनहि अपिलांत तशी तक्रार घेण्यांत आली नाहीं. वास्तविक अपील हें सोसायटीविरुद्ध सुरू केलेलें न्यायकाम होतें. परंतु अपील हें मूळ दाव्याचेंच अनुषंगिक अंग समजावें असे न्यायालयीन निर्णय आहेत. त्यांचा फायदा कदाचित् प्रतिवादीस मिळाला असता. तें कांहीं असो, प्रतिवादींनीं अपील दाखल करतांना रजिस्ट्रारची संमति घेतली नव्हती एवढी गोष्ट खरी. त्यानंतर अपीलाचा निकाल प्रतिवादीसारखा झाल्यावर सोसायटी हायकोर्टांत दुसरें अपील घेऊन गेली, तेव्हां पुनः प्रतिवादीच्या व सोसायटीच्या भूमिकांत फरक पडला. हायकोर्टातील अपीलाचें काम हें सोसायटीनें प्रतिवादींवर आणलेलें काम असल्याकारणानें त्याचेसाठी प्रतिवादीस रजिस्ट्रारची संमति मागण्याचें कांहींच कारण नव्हतें. याच अपिलाच्या निकालांत प्रतिवादीस खर्चाची रकम वसूल करून घेण्याचा अधिकार मिळाला. तेव्हां सोसायटीकडून सुरू झालेल्या न्यायकामांत मिळालेला खर्च वसूल करण्यासाठी द्यावयाच्या दरखास्तीस रजिस्ट्रारची संमति आवश्यक लागणार नाहीं, असा दरखास्तदाराचा समज होणें हायकोर्टास साहजिक वाटलें. तेव्हां सोसायटी व दरखास्तदार यांच्या भूमिकांत वेळोवेळीं पडलेले हे नाजूक फरक लक्षांत घेऊन हायकोर्टानें दरखास्तदार यांस रजिस्ट्रारकडून जरूर ती संमती मिळवून आणण्यास सवड दिली व प्राथमिक कोर्टानें तोंपर्यंत दरखास्तीचें काम स्थगित ठेवावें व दरखास्तदारानें रजिस्ट्रारची संमति आणल्यावर तें पुढें चालवावें असा हुकम दिला.

( ए. आय्. आर. १९४८ बॉम्बे १३१ )

## साखर कारखान्यांत गाळलेल्या उंसावर पट्टी

साखरेवरील किंमतीच्या कंट्रोलच्या काळांत मुंबई प्रांतांतील साखर कारखान्यांना इतर ठिकाणच्या कारखान्यांपेक्षा ज्यास्त फायदा मिळाला, कारण उंसाचे बाबतींत त्यांना परिस्थिति अधिक अनुकूल होती. साखरेवरील नियंत्रण दूर केल्यावरहि, दक्षिणेंतील कारखान्यांना संयुक्त प्रांत व बिहार येथील कारखान्यांपेक्षा दरमणीं ५ रुपये एवढी कूस ज्यास्त उरते, असेंहि म्हणतात. ह्या दोन्ही गोष्टींच्या आधारावर, मुंबई सरकारनें प्रांतांतील साखर कारखान्यांवर पट्टी बसवून तिचा विनियोग मुख्यतः उंसाच्या व इतर शेतीच्या आणि साखरेच्या धंद्याच्या सुधारणेकडे करण्याचें योजिलें आहे. साखर कारखान्यांना लायसेन्स काढावा लागेल आणि दरवर्षी ऊंस गाळण्यास प्रारंभ करण्यापूर्वी तो नवा करून घ्यावा लागेल. कारखान्यांत गाळल्या जाणाऱ्या उंसाबाबत आकडे कारखान्यांनीं सरकारला पुरवावयाचे आहेत. कारखान्यांची तपासणी करण्याचा अधिकार सरकारास राहीलच. मुंबई प्रांतांतील साखर कारखान्यांत दरसाल ६½ लक्ष टन ऊस गाळला जातो आणि त्यावर मणास ६ आणेपर्यंत पट्टी बसविण्याचा अधिकार सरकार घेत आहे. ह्या पट्टीचे उत्पन्नांतून एका स्वतंत्र शुगरकेन सेस फंडाची उभारणी करण्यांत येईल. प्रत्यक्ष कोणत्या दरानें पट्टी बसवावयाची, तें सरकार मागाहून जाहिर करील. तोंपर्यंत उंसावर दरमणीं ३ आणेप्रमाणें १ जानेवारी, १९४८ पासूनच्या ऊंसगाळणीवर पट्टी आकारली जाईल. पट्टीपासून सरकारास ४० लक्ष रुपये मिळतील, असा अंदाज आहे.

### मंगळवारीं सुट्टी, परंतु त्यापूर्वीच्या रविवारीं काम करण्यास कामगारांचा नकार

"टेक्स्टाइल लेबर असोसिएशनच्या अडवणुकीच्या धोरणामुळें देशाचें ३० ते ४० लक्ष वार कापडाचें नुकसान झालें आहे. उत्पादनवाढ अत्यंत आवश्यक असतांना आणि रविवारीं गिरण्या चालू ठेवण्यास मुंबईच्या मजूर मंत्र्यांनीं खास परवानगी दिलेली असतांना, रविवारीं मजूर गैरहजर राहिले. रविवारीं काम केलें असतें तरी मंगळवारीं सुट्टी होतीच. परदेशांतील मजूर जादा तास काम करण्यासहि तयार होतात, त्यांची वृत्ति कोणीकडे आणि आमच्या कामगारांची वृत्ति कोणीकडे ?":–अहमदाबाद मिल ओनर्स असोसिएशनचें निवेदन.

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

– शेड्यूल्ड बँक –

| | |
|---|---|
| वसूल झालेलें भांडवल | रु. १६,००,००० |
| रिझर्व व इतर फंड | रु. ४,१०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. २,००,००,००० |

संचालक मंडळ

श्री. धों. कृ. साठे ( चेअरमन )
श्री. वा. पुं. वर्दे ( व्हा. चेअरमन )


| | |
|---|---|
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. मा. रा. जोशी | श्री. फ. दो. पदमजी |
| श्री. मा. वि. शहा | श्री. शं. ल. किर्लोस्कर |
| श्री. भा. म. गुप्ते | श्री. मो. रा. ढमढेरे |

ट्रस्टी व एक्झीक्युटरचे कामाबाबत चौकशी करा.

मुख्य कचेरी :
लक्ष्मी रोड, पुणें २

चिं. वि. जोग,
मॅनेजर.





अधिक धान्य पिकविण्याची योजना

—यशस्वी होण्यास—

## किर्लोस्कर पंपिंग सेट्स

हें अमोघ साधन आहे.

त्याचें सहाय घ्या !

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी



# दि सुप्रीम म्यूच्युअल ॲशुअरन्स कंपनी, लि.

हैद्राबाद संस्थानांत महत्त्वाचे ठिकाणीं प्रतिनिधी नेमणें आहेत.
ठराविक कामाची हमी देऊं शकणाऱ्या वजनदार
गृहस्थांनीं भेटावें अथवा लिहावें.

| | | |
|---|---|---|
| चालू काम | ... | १ कोटीचे वर |
| चालू हप्त्यांचें उत्पन्न | ... | २,३१,१७६ रु. चे वर |
| खर्चाचें प्रमाण | ... | १४·९ टक्के |
| आयुर्विमा निधि | ... | ४ लाखाचे वर |

कंपनीच्या सोलापूर वसाहतीचे बांधकामास लवकरच सुरुवात होणार आहे.

: काम लवकर संपविणेसाठीं :

मुदतीच्या ठेवी घेणें आहेत.

मुदत व व्याजाचा दर याची माहिती कंपनीचे ऑफिसकडे मिळूं शकेल.

टी. डी. देशपांडे,
बी. ए., एलएल. बी.
सेक्रेटरी.

हेड ऑफिस :
८६६ सदाशिव पेठ, पुणें २.

व. न. म्हैसूर,
एम. ए., एलएल. बी.
मॅनेजर.

### पनवेल तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ लि., पनवेल

अहवालाचे सालीं डिसेंबर, १९४७ पर्यंत संघानें नियंत्रित वस्तु वाटपाचें काम केलें. त्याचप्रमाणें तालुक्याचा साखर-गूळ इ. चा घाऊक धंदाहि होता. १९४७ अखेर सरकारनें रेशन वाटप-पद्धति बंद केल्यानें संघाचें बरेचसें काम कमी झालें आणि कामाचे इतर मार्ग शोधण्यास प्रारंभ झाला. सुदैवानें फेब्रुवारी महिन्यांत जी. आय.पी. रेल्वेचें काम मिळालें आणि हें काम सतत संघाकडे राहील अशी आशा आहे. मे, १९४८ मध्यें संघानें स्वस्त धान्याचीं दुकानें चालविण्यास घेतलीं आहेत. ह्यापुढें सर्व जीवनावश्यक वस्तूंवर नियंत्रण बसणार आहे आणि सबंध जिल्ह्यांतील कापडाच्या घाऊक खरेदीचें व कापड वाटपाचें कामहि संघास मिळण्याचा पुष्कळ संभव आहे. अहवालाचे वर्षीं संघानें २१ लक्ष रुपयांची उलाढाल केली. नफा ५,७६६ रु. झाला. ६¼% डिव्हिडंडला २,२४३ रु. लागले. चालू वर्षी संघाच्या कार्यास आणखी जोम लागून त्याचे हातन अधिक कामगिरी, होईल, असा अंदाज आहे. ( चेअरमन : श्री. त्रिं. ना. बेडेकर; मॅनेजरः श्री. एन पी. शहा. )

### प्रांतिक फिनॅन्स कॉर्पोरेशनला विलंब का?

मुंबई प्रांतासाठी स्थापावयाच्या इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनच्या घटनेचा खर्डा तयार आहे. अशा तऱ्हेची निम-सरकारी संस्था स्थापन करण्याची प्रांताला आज कायद्यानें परवानगी दिसत नाहीं. ती परवानगी देणारें बिल मध्यवर्ती विधिमंडळास त्याच्या येत्या अधिवेशनांत सादर केलें जाईल. त्यानंतर, प्रांतिक बिल मंजुरीसाठी प्रांतिक विधिमंडळाकडे येईल. वरील खुलासा प्रांतिक अर्थमंत्री श्री. मेहता ह्यांनीं कै. गुरुनाथ प्रभाकर ओगले स्मृतिदिनाच्या आपल्या व्याख्यानांत ता. १६ रोजीं केला.

### आठवड्यांतून चार दिवस दारूबंदी

येत्या एप्रिलपासून मुंबई प्रांतांतील दारूचीं दुकानें आठवड्यांतून पांच दिवस बंद ठेवण्याचें ठरलें होतें. परंतु तीं चारच दिवस बंद ठेवावीं, असें प्रांतिक दारूबंदी बोर्डानें आतां ठरविलें आहे. प्रांतिक सरकारचें दारूबंदीचें धोरण कायम आहे.

### महाराष्ट्रांतील सहकारी मार्केटिंग सोसायट्यांची परिषद

वरील परिषद् बुधवार, ता. २० ऑक्टोबर रोजीं पुणें येथें गोखले हॉलमध्यें भरणार आहे. अर्थ-सहकार मंत्री श्री. वैकुंठराय मेहता हे परिषदेचें उद्घाटन करतील. प्रिं. द. गो. कर्वे हे परिषदेचें अध्यक्षस्थान स्वीकारणार आहेत. परिषदेची वेळ सकाळीं ११ ते दुपारीं १ व दुपारीं २ ते संध्याकाळीं ६, अशी आहे.

**ऑस्ट्रेलिआंत नवीन वसाहतवाले**—ऑस्ट्रेलिआंत वसाहत करण्यासाठीं १४ हजार नवीन लोक लवकरच जाणार आहेत. त्यांपैकीं ७,५०० ब्रिटिश नागरिक आहेत. ऑस्ट्रेलिआची लोकसंख्या जास्तीत जास्त ७५ लाख असल्यानें अजून नवीन वसाहतवाल्यांना तेथें वाव आहे.

**जपानी मच्छिमारी मोहीम**—दक्षिण ध्रुवाजवळ व्हेल माशांची शिकार करण्यासाठी जपानी बोटींचा तांडा नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत निघणार आहे. युद्धानंतर निघालेली ही तिसरी मोहीम आहे. ह्या मोहिमेमुळें जपानच्या अन्नपदार्थांच्या साठ्यांत १० टक्के भर पडणार आहे, असें मत एका जपानी प्रवक्त्यानें व्यक्त केलें आहे.


## बँक ऑफ पूना लि.

– शेड्यूल्ड बँक –

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | २५,००,००० |
| वसूल भांडवल | १२,५०,००० |

**संचालक मंडळ**

१ शेठ मुरलीधर चतुर्भुज लोया—चेअरमन, २ शेठ डी. आर. नाईक, जे. पी. ( व्हा. चेअरमन ), ३ डॉ. ना. भि. परुळेकर एम. ए., पीएच. डी., संचालक—सकाळ, ४ शेठ फ्रामजी पी. पोचा, ५ शेठ लक्ष्मीनारायण रामचंद्र राठी ( सोलापूर ), ६ शेठ नारायणदास श्रीराम सोमाणी, ७ शेठ गणपतराव काळूराम नाईक, बी. एससी., बी.ई.,एलएल. बी.

**मुख्य ऑफिस—४५५, रविवार, पुणें**

शाखा:—( १ ) भवानी पेठ, ( २ ) सदाशिव पेठ, पुणें २, ( ३ ) सोलापूर. ( ४ ) सांगली.

हिंदुस्थानांतील प्रमुख शहरांवर ड्राफ्ट्स् व हुन्ड्या दिल्या जातात.

आपल्या जवळच्या पैशाचा योग्य मोबदला या बँकेच्या निरनिराळ्या योजनेनें घ्या. सेफ डिपॉझिट लॉकरची सोय.

विशेष माहितीकरितां लिहा—

गो. ग. साठे. ए. बी. आय. (लंडन), मॅनेजर

## सारस्वत

## को—ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई

[ स्थापना १९१८ ]



टे. नं. ३१६७५

| | |
|---|---|
| विक्रीस काढलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... | रु. ४,१३,६१० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स ... | रु. २,५१,४०० |
| ठेवी ... | रु. ८६,७१,००० |
| एकूण खेळतें भांडवल ... | रु. ९४,३३,००० |

**बचतीच्या आकर्षक योजना**

—विशेष माहितीसाठी लिहा अगर भेटा –

सब–ऑफिस : —दादर— ( बी. बी. रेल्वे स्टेशनसमोर )

व्ही. पी. वर्दे, बी. कॉम्. चेअरमन

एस. व्ही. संझगिरी, बी. कॉम्. सेक्रेटरी

### ट्रेझरी डिपॉझिट रिसीटस

लहान मुदतीसाठीं पैसे गुंतविणाऱ्या बँका वगैरेंच्या सोईसाठीं हिंदुस्थान सरकारनें ट्रेझरी डिपॉझिट रिसीटस सुरू केल्या आहेत, त्यांच्या विक्रीस १५ ऑक्टोबर रोजीं प्रारंभ झाला. ह्या रिसीटस रिझर्व्ह बँकेच्या मुंबई, कलकत्ता, दिल्ली, मद्रास व कानपूर येथील कचेऱ्यांतून दिल्या जातील व मुदत भरल्यावर तेथेंच त्यांचे पैसे परत देण्यांत येतील. २५,००० रु. किंवा त्याच्या पटींच्या रकमेच्या किंमतीच्या रिसीटस विकल्या जातील. ६ महिन्यांस १%, ९ महिन्यांस १¼% व १२ महिन्यांस १½% व्याज मिळेल. रिसीटस वर्ग करतां येणार नाहींत आणि मुदतीनंतरच त्यांची रकम परत मिळेल. मुदतीपूर्वीहि तांतडीची नड असेल, तर व्याज कापून रकम परत देण्याचा रिझर्व्ह बँकेस अधिकार आहे.

---

### हिंदुस्थानांतील विदेशीयांच्या मालमत्तेची जंत्री

देशांतर्गत येण्यादेण्याची माहिती एकत्रित करण्याचें महत्त्व पुढारलेल्या देशांना पटलेलें असून त्या माहितीच्या आधारें राष्ट्रीय धोरण आखण्यास सहाय होतें. हिंदुस्थानाविषयीं असे आकडे आजवर गोळा करण्यांत आलेले नाहींत. इं. मॉ. फंडानें अशी माहिती सर्व सभासद-राष्ट्रांकडून मागविली आहे आणि ती पुरविण्यासाठीं ही माहिती गोळा करणें आतां आवश्यक आहे. रिझर्व्ह बँकेनें हिंदुस्थानविषयक माहितीचें काम हिंदुस्थान सरकारच्या वतीनें हातीं घेतलें आहे. ३१ डिसेंबर, १९४८ पूर्वी माहिती देण्याचें कायदेशीर बंधन कांहीं प्रकारच्या व्यक्तींवर व कंपन्यांवर सरकारनें घातलें आहे. ही माहिती रिझर्व्ह बँक एकत्रित करील.

---

### डालमिया सिमेंट लि.

वरील कंपनीनें १९४७ सालीं १ कोटि, १७ लक्ष रुपयांची विक्री करून २४½ लक्ष रु. ठोक व ९ लक्ष रु. निवळ नफा मिळविला. रिझर्व फंडांत कांहींहि भर न घातल्यामुळें कंपनी ऑर्डिनरी भागांवर ५% डिव्हिडंड देऊं शकली. डिव्हिडंडचा दर १९४६ मध्यें ७½% होता. कंपनीच्या तीन कारखान्यांपैकीं दोन कारखाने पाकिस्तानांत ( कराची व दंडोत –प. पंजाब ) आहेत; त्यांच्याविषयीं रिपोर्टांत खुलासा आढळत नाहीं. चालू वर्ष सिमेंटच्या धंद्यास अधिक अनुकूल दिसतें.

---

### दि पूना अर्बन को. बँक लि. चें नवें डायरेक्टर बोर्ड

श्री. मो. ना. पाटसकर ( चेअरमन ), श्री. दि. वि. इनामदार, श्री. र. पां. भोंडे वकील, श्री. न. भा. कुलकर्णी, श्री. द. व्यं. विसाळ, श्री. दि. शं. जोशी, श्री. व्यं. ना. पोळ, श्री. य. वा. जेधे, श्री. म. भा. शेळके. श्री. पां. वि. इनामदार हे बँकेचे सेक्रेटरी आहेत.

---

### ग्रेट ब्रिटनमध्यें सिगारेट्सचा तुटवडा

ग्रेट ब्रिटनमध्यें दर आठवड्यास १ अब्ज, ६० कोटी सिगारेट्स विक्रीस येतात; युद्धापूर्वी १ अब्ज, ४५ कोटी सिगारेट्स खपत असत. धूम्रपान करणारांची संख्या वाढली आहे. विशेषत: ज्यास्त स्त्रिया सिगारेट्स ओढूं लागल्या आहेत. सिगारेट्स मिळणार नाहींत, ह्या भितीनें लोक त्या साठवूं लागले आहेत. लोकांनीं १०% सिगारेट्स कमी ओढाव्या अशी ब्रिटिश सरकारनें आपल्या नागरिकांना विनंति केली आहे. ही विनंति अमलांत आली तर सिगारेट्स विकत घेण्यासाठीं रांगा करून उभें रहावें लागणार नाहीं. अमेरिकेकडून आणखी तंबाखू न घेतां ब्रिटिश साम्राज्यांतूनच ती मिळविण्याचा ब्रिटिश सरकारचा प्रयत्न आहे.

कृष्णा शुगर मिल्स लि.
कृष्णा–कित्तूर
कन्फेक्शनरी सुरू झाली.
धंद्याच्या वाढीसाठीं ठेवी स्वीकारल्या जातात.
६% क्यु. प्रेफरन्स शेअर्स विक्रीस आहेत.
विशेष माहितीसाठीं लिहा.
पोस्टः–कृष्णा–कित्तूर
जिल्हाः–बेळगांव.
विंचूरकर ॲण्ड को.
मॅनेजिंग एजण्टस्.

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

कूळ कायदा
आवृत्ति ३ री एका वर्षांत प्रसिद्ध झाली. किं. ३ रु.
मुंबई सावकारी कायदा किं. २॥ रु.
नवीन भाडें नियंत्रण कायदा किं. २ रु.
द्विभार्या प्रतिबंधक कायदा किं. १ रु.
हिंदू घटस्फोट कायदा किं. १ रु.
शेतकरी कर्जनिवारण कायदा { कापडी किं. ४॥ रु. / कागदी किं. ४ रु.
हीं सर्व पुस्तकें आजतागायतच्या दुरुस्त्यांसह असून त्यांत अद्ययावत् न्यायालयीन निर्णय, चिकित्सक व सविस्तर टीपा व मूळ इंग्रजी टेक्स्ट आहेत. हीं पुस्तकें पुण्याच्या व्यवसायी वकिलांनीं तयार केलीं आहेत.
पत्ता––लॉ ॲकॅडेमी, ७२० सदाशिव, पुणें २.







हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व
रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.